



https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


## देशात मे महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस, उष्णतेचा तडाखाही कायम राहणार

### हवामान खात्याचा अंदाज



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** देशात मे २०२६ महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, त्याचवेळी काही भागात उष्णतेच्या लाटाही अधिक तीव्र होण्याचा इशारा भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) दिला आहे. विशेषतः महाराष्ट्र, गुजरात, पूर्व किनारपट्टी आणि हिमालयाच्या पायथ्याच्या भागात उष्णतेच्या लाटांचे दिवस वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. देशातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्य ते कमी राहण्याचा अंदाज असला, तरी दक्षिण भारत, ईशान्य आणि वायव्य भारतातील काही भागात तापमान सामान्यपेक्षा जास्त राहू शकते. किमान तापमान मात्र बहुतांश ठिकाणी सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. पावसाच्या बाबतीत, देशभरात सरासरीपेक्षा (१०० टक्क्यांहून अधिक) पाऊस अपेक्षित आहे. बहुतांश भागात सामान्य ते जास्त पाऊस होईल; मात्र पूर्व, ईशान्य आणि पूर्व-मध्य भारतातील काही भागात कमी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशांत महासागरातील 'एल निनो' परिस्थिती विकसित होण्याची चिन्हे दिसत असून, याचा मान्सूनवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच हिंद महासागरातील 'आयओडी' सध्या तटस्थ असून, मान्सूनच्या उत्तरार्धात सकारात्मक स्थितीकडे झुकण्याचा अंदाज आहे. या हवामान बदलांचा शेतीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. जास्त पावसामुळे मातीतील ओलावा वाढून खरीप हंगामासाठी तयारीस मदत होणार असली, तरी काही भागात पाणी साचणे आणि बुरशीजन्य रोग वाढण्याचा धोका आहे. उष्णतेच्या लाटांमुळे पिकांवर ताण येऊन फळगळ आणि उत्पादनात घट होऊ शकते. यामुळे राज्य सरकारे व स्थानिक प्रशासनाने उष्णतेच्या लाटांसाठी आवश्यक तयारी ठेवावी, तसेच शेतकऱ्यांनी पिकांच्या संरक्षणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

एप्रिल महिन्यात राज्यात अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावल्याने उन्हाच्या कडेला काही प्रमाणात आळा बसला. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या; काही भागात गारपीटही झाली. या अवकाळी पावसामुळे दिवसाच्या कमाल तापमानात चढ-उतार दिसून आला आणि काही दिवस तापमानात घटही नोंदली गेली. मात्र पावसानंतर पुन्हा उष्णतेची तीव्रता वाढत असल्याचे चित्र आहे. अनेक शहरांत तापमानाने ४० अंशांच्या पुढे झेप घेतली, तर काही ठिकाणी उष्णतेची लाटही जाणवली. या बदलत्या हवामानामुळे शेतीपिकांवर ताण निर्माण झाला असून, फळबागांनाही फटका बसल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

## ममता दीदींचा 'खेळा' संपणार

## यंदा बंगालमध्ये भाजप सरकार - नवनीत राणा

### दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत साधला विशेष संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती :** भाजप नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी एक्झिट पोलच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या राजकारणावर जोरदार टीका केली आहे. यंदाच्या एक्झिट पोलमधून राज्यात मोठा राजकीय बदल होण्याचे संकेत मिळत असून, जनतेचा कल भारतीय जनता पक्षाच्या बाजूने असल्याचा दावा त्यांनी केला.राणा म्हणाल्या की, पश्चिम बंगालमधील जनता अवैध घुसखोरी आणि ढासळलेल्या कायदा-सुव्यवस्थेमुळे त्रस्त झाली आहे. राज्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून, परिस्थिती इतकी बिघडली आहे की मुख्यमंत्री स्वतः महिलांना सायंकाळनंतर घराबाहेर न पडण्याचा सल्ला देतात, असा आरोप त्यांनी केला.मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधताना राणा म्हणाल्या की, यंदाच्या निवडणुकीत महिलांनी आणि मातांनी मोठ्या प्रमाणात मतदान करून परिवर्तनाला पाठिंबा दिला आहे. या वेळी ममता दीदींचा 'खेळा' चालणार नाही, तर भाजपच्या विचारसरणीला जनतेचा कौल मिळणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.इव्हीएम संदर्भात तृणमूल काँग्रेसकडून करण्यात येणाऱ्या आरोपांवरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. ममता बॅनर्जी निवडणूक जिंकतात तेव्हा ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही, मात्र पराभवाची शक्यता निर्माण झाली की त्याच यंत्रणेला दोष देण्याची जुनी पद्धत विरोधकांकडून वापरली जाते, असे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी ठामपणे म्हटले की, या निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता स्थापन होईल. महिलांची सुरक्षा, अवैध घुसखोरीवर नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी कठोर निर्णय घेतले जातील, असा विश्वासही त्यांनी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना व्यक्त केला.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'मिसिंग लिंक'चे लोकार्पण

### देशातील पहिल्या द्रुतगती मार्गावरील भव्य प्रकल्प, तत्कालीन ठाकरे सरकारची १३ कारणे फेटाळली, सुप्रिया सुळेंनाही प्रत्युत्तर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मुंबई**

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास आणखी जलद करण्यासाठी २०१० मध्ये मिसिंग लिंकची संकल्पना मांडली. पण तत्कालीन काँग्रेस सरकारने एक नव्हे १३ कारणे देत प्रकल्प बासनात गुंडाळा. हा प्रकल्प आव्हानात्मक असून तो करणे अशक्यप्राय असल्याचे त्यावेळी सांगण्यात आले होते. पण आमचे सरकार आले आणि आम्ही हे आव्हान पेलत मिसिंग लिंक करून दाखवली अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर टीका केली.

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक लोकार्पणाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या मिसिंग लिंकमुळे मुंबई-पुणे प्रवास अतिजलद होणार असून या प्रकल्पाला मिसिंग लिंक नव्हे तर 'कनेक्टिंग लिंक' असे संबोधावे. या मार्गिकेला लवकरच नाव देण्यात येईल. पण मिसिंग लिंक हे नाव बदलून कनेक्टिंग लिंक करावे, अशी सूचनाही त्यांनी यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) केली.

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरून दररोज सव्वा लाखांहून अधिक वाहने धावतात. यात भविष्यात आणखी वाढ होणार आहे. हा महामार्ग सध्या वाढत्या वाहन संख्येला सामावून घेण्यासाठी अपुरा पडत आहे. त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी १३.३ किमीचा मिसिंग लिंक प्रकल्प २०१९ मध्ये हाती घेण्यात आला. ६६९५ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प २०२१ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अनेक कारणांमुळे या प्रकल्पास विलंब झाला. आता मात्र या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून शुक्रवारी, महाराष्ट्र दिनी या प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण पार पडले. लोकार्पणानंतर काही तासातच हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आणि त्यावरून वाहने धावू लागली. मिसिंग लिंकचे भूमिपूजन आणि लोकार्पण आपल्याच काळात होत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला. मिसिंग लिंक प्रकल्पावरून त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका हि केली.

हा प्रकल्प अभियांत्रिकी आव्हान होते. सोसाट्याचा वारा वाहत असताना काम करणे अत्यंत कठीण होते. मात्र एमएसआरडीसीने आणि कंत्राटदारांनी हे आव्हान पेलले, प्रकल्प पूर्ण केला, असे सांगत त्यांनी अधिकारी आणि कंत्राटदारांचे कौतुक केले.

## मुंबईत ड्रग्जचा महाभंडाफोड

## ३४९ किलो कोकेन जप्त; १७४५ कोटींचा माल

### अमित शहांचा 'बॉटम टू टॉप' उल्लेख, आंतरराष्ट्रीय रॅकेट उद्ध्वस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत मोठ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश झाला असून नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) ने ३४९ किलो उच्च प्रतीचे कोकेन जप्त केले आहे. या अमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे १७४५ कोटी रुपये असल्याचे समोर आले आहे. या कारवाईबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विशेष कौतुक करत 'बॉटम टू टॉप' तपासाचे हे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे म्हटले आहे.



मुंबईत झालेली ही कारवाई देशातील ड्रग्जविरोधी मोहिमेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी एका लहान खेपेपासून तपास सुरू करत अखेर संपूर्ण आंतरराष्ट्रीय जाळ्याचा मागोवा घेतला. या तपासातून मोठ्या प्रमाणावर कोकेन साठा जप्त करण्यात यश आले. या कारवाईमुळे देशात सक्रिय असलेल्या ड्रग्ज नेटवर्कला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना अमित शहा यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत स्पष्ट केले की, अमली पदार्थांच्या कार्टेल्सचा नायनाट करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. त्यांनी नमूद केले की, एनसीबीने अत्यंत काटेकोर तपास करून लहान सुरागांपासून मोठ्या रॅकेटपर्यंत पोहोचत ही कारवाई केली आहे. हे 'बॉटम टू टॉप' तपासाचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी या यशासाठी एनसीबीच्या संपूर्ण पथकाचे अभिनंदन केले.या कारवाईमुळे मुंबईत तसेच देशभरात ड्रग्जविरोधी कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या ड्रग्ज टोळ्यांवर यामुळे मोठा परिणाम होणार आहे. तपास यंत्रणांनी या प्रकरणात आणखी काही धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली असून पुढील काही दिवसांत अधिक खुलासे होण्याची शक्यता आहे.

## अशोक खरातला ४ दिवसांची पोलिस कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नाशिक-** भोंदू अशोक खरातला आज ५ कोटींची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक न्यायालयाने ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. यावेळी फिर्यादीच्या वकिलांनी अशोक खरातने आपल्या अशिलाला साप दाखवून मृत्यूची भीती दाखवल्याची बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली.



भोंदू अशोक खरातच्या अडचणींत दिवसागणिक वाढ होत आहे. विशेष तपास पथकाने खरातचा ताबा घेतल्यानंतर आज त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीनंतर कोर्टाने खरातला राजेंद्र अशोक जासूद यांची ५ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. यावेळी फिर्यादी राजेंद्र जासूद यांच्या वकिलांनी अशोक खरातने आपल्या अशिलाला पूजा केली नाही तर मृत्यू अटळ असल्याचे सांगत फसवणूकी केल्याचा आरोप केला.

फिर्यादीच्या वकिलांनी कोर्टाला सांगितले की, राजेंद्र जासूद यांना त्यांचा लॉजिस्टिकच्या व्यवसायाचा जगभर विस्तार करायचा होता. त्यांनी याविषयी अशोक खरातचा सल्ला घेण्याचा विचार केला. ते त्यांच्याकडे गेले असता खरातने त्यांना अवतार पूजा करण्याचा सल्ला दिला. ही पूजा करण्यासाठी ३ देश फिरावे लागतील. त्यानंतर ईशान्येश्वर मंदिरात पूजा करावी लागेल, असे खरातने त्यांना सांगितले. तसेच ही पूजा केली नाही, तर तुझा मृत्यू अटळ आहे अशी भीतीही त्यांना दाखवली. त्यानंतर त्याने जासूद यांच्याकडून तब्बल ५ कोटी रुपये उकळले. एवढेच नाही तर पूजा करताना खरातने जासूद यांना नकली साप दाखवून घाबरवण्याचाही प्रयत्न केला.




## भीषण कार चा विचित्र अपघात

मोझरी परिसरात भरधाव कारचा विचित्र अपघात; नियंत्रण सुटल्याने दुभाजकावर अशी चढली कार, सुदैवाने जीवितहानी टळली.

## भाजपची साथ सोडली तरच विलिनीकरण शक्य: रोहित पवारांची NCP पुढे अट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अहिल्यानगर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेससोबतच्या संभाव्य विलिनीकरणाची तार छेडली आहे.

पण यासाठी त्यांनी राष्ट्रवादीपुढे भाजपची साथ सोडण्याची अट ठेवली आहे. अजित पवारांच्या पक्षाने भाजपची साथ सोडली, तरच दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत पुन्हा एकदा विलिनीकरणाच्या चर्चेचा मुद्दा चर्चिला जाण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. त्यात शरद पवार गटाच्या काही नेत्यांनी स्वतः अजित पवारांनी विलिनीकरणासाठी पुढाकार घेतल्याचा दावा केला होता. पण त्यावर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी आक्षेप घेतला होता.

दोन्ही पक्षांत अशी कोणतीही चर्चा सुरू असल्याची आपल्याला माहिती नव्हती अशी भूमिका त्यांनी घेतली होती. त्यामुळे कालांतराने हा मुद्दा मागे पडला. पण आता आमदार



रोहित पवार यांनी पुन्हा एकदा या विषयाला हात घालत त्याला हवा देण्याचा प्रयत्न केला आहे.

भाजपची साथ सोडली तरच विलिनीकरण

रोहित पवार यांनी आज अहिल्यानगरच्या कर्जत विधानसभा मतदार संघातील नागरी प्रश्नांवर आंदोलन केले. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, अजित पवार शेवटच्या टप्प्यात सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर भाजपच्या विरोधात बोलताना दिसत होते.

पण आता सत्तेच्या राजकारणात त्यांचा पक्ष पुन्हा भाजपच्या मांडीला मांडी लावून बसणार असेल, तर ह्या स्थितीत एकत्र येणे अत्यंत कठीण आहे. भाजपच्या विचारधारेसोबत गेलेल्यांना पुन्हा सोबत घेणे आमच्यासाठी शक्य नाही. अजित पवारांच्या पक्षाने भाजपची साथ सोडली, तरच दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

# जिल्ह्याच्या कृषी-औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानावर भर

## ६७ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

### – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती**

शेती व उद्योग क्षेत्रात आधुनिकतेची कास धरीत जिल्ह्याने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि त्यांना आर्थिक सुरक्षा मिळावी यासाठी शासनाने अनेक महत्त्वाच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि उद्योग क्षेत्राचा विकास करून जिल्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या निमित्ताने पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे मुख्य शासकीय समारंभ संपन्न झाला. यावेळी सहकार मंत्री श्री. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते . पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, प्र. विभागीय आयुक्त अजय लहाने, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. राज्य शासनाने पीक कर्जासाठी २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार असून ही प्रक्रिया लवकरच प्रत्यक्ष सुरू होणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित १ लाख १५ हजार ८६२ शेतकऱ्यांना ७४५ कोटी रुपयांची मदत थेट खात्यात जमा करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता २ लाख ७१ हजार ७६२ शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे. कृषी यांत्रिकीकरणासाठी १४.८५ कोटी रुपये खर्चून २ हजार ९८ शेतकऱ्यांना यंत्र व औजारे खरेदीसाठी मदत केली आहे.

मोर्शी आणि वरुड येथील सिट्रस इस्टेटमध्ये आता एआय (-ख) आधारित तंत्रज्ञान राबविले जाईल.

सिंचनासाठी 'प्रती थेंब अधिक पीक' योजनेत ३ हजार ५५९ आणि मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेत २ हजार १५३ लाभार्थींची निवड झाली आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत अमरावती जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला असून ही जिल्हावासियांसाठी अभिमानाची बाब आहे.

जिल्ह्याच्या औद्योगिक विकास आणि महिला सक्षमीकरणावर भर देण्यात येत असल्याचे सांगून सहकार मंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले,अमरावतीमध्ये 'पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क' आणि विमानतळावरील नाईट लँडिंग सुविधेमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. औद्योगिक वसाहतीत आयटी पार्क आणि आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र आकारास येत आहे. रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १ हजार ५५ कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून, यात ६३३ महिला उद्योजिकांचा समावेश आहे.

आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कल्याणआरोग्य विभागातर्फे महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि आयुष्मान कार्ड वाटप सुरू आहे. मेळघाटातील माता-बालमृत्यू दर शून्यावर आणण्यासाठी 'मेळघाट परिक्रमा' उपक्रम राबविला जात आहे. महिलांसाठी 'पिंक ई-रिक्षा', 'आई' योजना आणि 'लाडकी बहीण' योजनेद्वारे आर्थिक सक्षमीकरण केले जात असून, जिल्हा 'बालविवाहमुक्त' करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. पर्यटन क्षेत्रात चिखलदरा येथील स्कायवॉक पूर्ण करण्यावर भर दिला जात असून आमझरी गावाची 'मधाचे गाव' म्हणून निवड झाली आहे. तसेच, संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट' विकसित करण्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशाच्या पहिल्या डिजिटल जनगणनेत नागरिकांनी अचूक माहिती भरून सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पाटील यांनी यावेळी केले. महाराष्ट्र दिनानिमित्त आणि जागतिक कामगार दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

**पुरस्कार वितरण सोहळा**


विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सन २०२४-२५ या वर्षासाठी 'विशेष जिल्हा युवा पुरस्कार' नाळ चित्रपट फेम बालकलाकार श्रीनिवास पोकळे, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य केल्याबद्दल युवक गटातून अमर वानखडे (तिवसा), युवती गटातून कु. जानव्ही राऊत (नया वाठोडा) तसेच संस्था गटातून श्री. संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था (गुरुकुंज आश्रम) यांना सन्मानित करण्यात आले. यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार, व्यसनमुक्ती, रक्तदान आणि आदिवासी विकास क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी युवक गटात समाजप्रबोधनकार वेदांत मुंदाने (अमरावती), युवती गटात कु. पुजा गुंजरकर (ब्राम्हणवाडा थडी) आणि संस्था गटात स्वामी विवेकानंद विचार मंच (अचलपूर) यांना सन्मानित करण्यात आले. अचलपूरच्या विवेकानंद विचारमंचने आरोग्य सेवा आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले आहे.

याशिवाय अपर आयुक्त सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे , सहायक ग्रंथालय संचालक राजेश पाटील, सहायक ग्रंथालय संचालक सुरजकुमार मडावी, अधीक्षक अभियंता मंगेश पाटील, महसूल सहायक मनीषा ढोके, शिक्षिका रितू तळमळे, ग्राम महसूल अधिकारी पवन मुंडे, जिल्हाधिकारी कार्यालयाचे संजय अंबाडेकर, जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाच्या सुमेधा बारलिंगे, मंजिरी महाजन, संध्या साउरकर, कविता पाचघरे,पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्रीधर गुळसुंदरे, पोलीस उपनिरीक्षक योगेश श्रीवास, अजय मिश्रा, प्रवीण काळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय पेठे, होमगार्ड सैनिक राजेंद्र शाहाकार, पोलीस हवालदार राजेश कोचे, राजीव बाहेनकर, दीपक सुंदरकर, शंकर बावनकुळे,पंकज गावंडे, उज्ज्वल सामुद्रे, सुरक्षारक्षक शिवकुमार तायडे यांना उत्कृष्ट कार्याबाबत यावेळी गौरविण्यात आले.प्रारंभी विविध शासकीय विभागामार्फत परेड संचलन करण्यात आले. मंत्री श्री. पाटील यांनी परेड संचलनाचे निरीक्षण केले. परेडचे संचलन परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी सागर भामरे तसेच दुय्यम परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुंदरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले.

# मॅपिंगच्या उद्दिष्ट्यपूर्तीनंतर लगेच जनगणनेचा भार

### अमरावती व बडनेरा मतदारसंघातील बीएलओंना १५ मे डेडलाइन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती-** महापालिका क्षेत्रातील बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) यांना मतदारयादी मॅपिंगचे काम १५ मेपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानंतर लगेच त्यांच्याकडे जनगणनेची जबाबदारी सोपविली जाणार आहे. याबाबत प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून बडनेरा आणि अमरावती शहर विधानसभा मतदारसंघातील बीएलओंना आता १५ दिवसांत मॅपिंगच्या उद्दिष्ट्यपूर्तीचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक ५७५ बीएलओ अमरावती व बडनेरा शहर, या दोन मतदारसंघांत कार्यरत आहेत. मात्र, याच ठिकाणी मॅपिंगचे प्रमाण कमी असल्याचे समोर आले आहे. अमरावती शहरात सुमारे ६७ टक्के, तर बडनेऱ्यामध्ये ७१ टक्केच काम पूर्ण झाले आहे. याउलट इतर विधानसभा मतदारसंघात हे प्रमाण ८० ते ८५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: या दोन्ही मतदारसंघांचा सविस्तर आढावा घेतला. त्यामध्ये सुमारे ११० बीएलओंची कामगिरी ६० टक्क्यांखाली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना तातडीने काम गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, १५ मेपासून स्वयंजनगणनेचे काम सुरू होणार आहे, ज्यामध्ये जिल्ह्यातील अनेक बीएलओंचा सहभाग राहणार आहे. त्यामुळे मॅपिंगचे काम त्याआधी पूर्ण करणे अत्यावश्यक ठरले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही परिस्थितीत १५ मे नंतर मॅपिंगचे काम प्रलंबित ठेवता येणार नाही. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील बीएलओंवर दुहेरी जबाबदारी आली असून, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी यंत्रणा सज्ज झाल्याचे दिसून येत आहे.



# अभियंत्यांच्या कार्यालयासमोर लावले बेशरमचे झाड

## दर्यापूरमध्ये विजेचा लपंडाव, नगरसेवक व नागरिक झाले संतप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१दर्यापूर-** शहरात सुरू असलेल्या अनियमित वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे विशेषत: उष्णतेच्या दिवसांत लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर दर्यापूर नगरपालिकेतील नगरसेवकांनी थेट विद्युत वितरण कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. नगरसेवकांनी अभियंत्यांच्या कार्यालयासमोर निषेध म्हणून बेशरमचे झाड लावून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित विभाग नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेत नसून संपर्क साधण्यासही अडचणी येत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला. यावेळी नेहा शिवाजी देशमुख, वंदना विठ्ठलसिंग सोलंकी, कविता दिलीप गवई, मंदा दादाराव इंगळे, वर्षा विनोद बोरेकर, मुनिफा बेग यांच्यासह इतर नगरसेविका-नगरसेवक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सर्वांनी मिळून अधिकाऱ्यांना निवेदन देत तत्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्यात याव्या, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही नगरसेवकांनी दिला आहे.

यापूर्वीसुद्धा विठ्ठलसिंह सोलंकी यांनी विद्युत वितरण कार्यालयाला अनेक वेळा तक्रारी दिल्या. मात्र त्याकडे दुर्लक्षच केले गेल्याचे सांगण्यात आले.

सध्या उन्हाचा तीव्र तडाखा वाढलेला असून गर्मीमुळे अचानक ब्रेकडाउन होते. पुढील दोन ते तीन आठवडे ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महावितरणला सहकार्य करणे अत्यंत गरजेचे आहे.

> आपल्या घरातील किंवा व्यावसायिक ठिकाणांमधील कचरा डीपीजवळ किंवा विद्युत तारांच्या खाली जाळणे टाळावे. अशा कृतीमुळे विद्युत पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ शकतात व तात्पुरता वीजपुरवठा खंडित करावा लागू शकतो. महावितरणचे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांनी जबाबदारीने वागून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.
>
> **-सारंग गजभिये,** सहायक अभियंता, अर्बन एक दर्यापूर.

# गुरुकुंजात शेतकरी ग्रामनाथांचा सन्मान

## ग्रामजयंती महोत्सवाची गोपालकाल्याने सांगता



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ तिवसा**

आपल्या खंजिरीच्या माध्यमातून अखिल विश्वाला मानवता, सर्वधर्म समभावाचा संदेश देणारे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा जन्मोत्सव अर्थात ग्रामजयंती महोत्सव त्यांची कर्मभूमी असलेल्या गुरुकुंजनगरी येथील महासमाधी परिसरात गुरुवारी (ता. ३०) पहाटे पाच वाजता हजारो गुरुदेवभक्तांच्या साक्षीने साजरा करण्यात आला. ग्रामजयंतीच्या पर्वावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज नगरीत गावकऱ्यांनी पहाटे ग्रामस्वच्छता केली. दरम्यान, तुकडोजी महाराज यांचा महासमाधी परिसर लक्ष लक्ष दिव्यांनी सजविण्यात आला होता. गुरुकुंजातील तुकडोजी महाराज यांच्या कर्मभूमीत पहाटे पाच वाजता सामुदायिक ध्यानाने या ग्रामजयंती महोत्सवाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर सामुदायिक ध्यान व महाआरती पार पडली. यावेळी सीमा इंगळे यांनी सामुदायिक ध्यानानंतर चिंतन व्यक्त केले. यावेळी उपस्थित हजारो भाविकांनी गोपालकाला व महाप्रसादाचा लाभ घेतला. संध्याकाळी पंडित शंकरराव वैरागकर यांच्या सुमधुर वाणीतून स्वरनांद संगीत संध्या राष्ट्रसंतांचा भजन संदेश प्रस्तूत करण्यात आला. राष्ट्रवंदनेने ग्रामजयंती महोत्सवाची सांगता करण्यात आली. यशस्वीतेकरिता समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण दळवी, उद्धव वानखडे, नंदकिशोर डिक्कर, सुहास टप्पे, अनिल चिखलकर, सागर रावणकर व सहभागी महिला मंडळ ग्रामजयंती महोत्सव समितीसह भाविकांनी परिश्रम घेतले.

शेतकऱ्यांचा सत्कार शेतात तिफण घेऊन राब राब राबणारे शेतकरी लक्ष्मीकांत भाऊराव पाचघरे, रामजी देविदास सावंत, श्रीकृष्ण उमप यांच्यासह पाच ग्रामनाथ शेतकऱ्यांचा अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळच्या वतीने सन्मान करण्यात आला. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांचा सन्मान हीच खरी ग्रामजयंती असल्याचे मत अ. भा. गुरुदेव सेवामंडळाचे उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित पद्मश्री जनार्दनपंथ बोथे, गुलाब खवसे, गोपाल कडू, अविनाश ठाकरे, दीपक वासनिक यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# अंदाज समिती पोहोचली अंजनगाव पालिकेत

## विकासात्मक प्रस्तावाला गती मिळणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ अंजनगाव सुर्जी,**

शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून मंत्रालयामध्ये अंजनगाव सुर्जी नगरपालिकेचे जे काही प्रस्ताव आले असतील त्या सर्व प्रस्ताव मान्यतेच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न निश्चितपणे केल्या जाईल, असे आश्वासन विधानसभा अंदाज समितीचे सदस्य आमदार किशोर पाटील यांनी २९एप्रिल रोजी अंजनगाव सुर्जी नगरपालिकेला दिलेल्या भेटीदरम्यान आयोजित बैठकीत दिले.

याप्रसंगी विधानसभा अंदाज समितीचे सदस्य आमदार कृष्णा खोपडे, आमदार मनीषा चौधरी उपस्थित होते. नगराध्यक्ष अविनाश गायगोले व उपाध्यक्ष प्रियंका मालठाने, मुख्याधिकारी विजय लोहकरे तसेच सर्व सभापती व सदस्य गण तसेच नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी नगरपरिषदेबाबत सविस्तर माहिती उपस्थित समितीसमोर दिली. नगराध्यक्षांनी शहरातील पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर माहिती देऊन त्याबाबत येणार्या समस्या व इतर सोयी सुविधांबाबत अंदाज समितीचे लक्ष केंद्रित करून सखोल चर्चा केली. त्यावर उपस्थित समितीने शासन स्तरावर अंजनगाव सुर्जी शहरातील पाणी पुरवठ्या बाबतचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येऊन त्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. शहराच्या विकासात्मक प्रस्तावाला मंत्रालयीन स्तरावर गती मिळणार असल्याने आता शहरवासीयांच्या विकासाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# अमरावतीत जनगणना मोहिमेला सुरुवात

## मान्यवरांकडून 'स्व-गणना' करून नागरिकांना आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती** अमरावती शहरात आजपासून जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला असून, यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.विशेष म्हणजे, महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभाताई खोडके, आमदार रविभाऊ राणा, उपमहापौर सचिन भेंडे तसेच स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी स्वतः स्व-गणना करून या उपक्रमाची सुरुवात केली आहे. त्यांनी नागरिकांनीही स्वयंस्फूर्तीने पुढे येत स्व-गणना पूर्ण करावी व या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे.जनगणना प्रक्रियेत अचूक व अद्ययावत माहिती नोंदविणे अत्यंत आवश्यक असून, डिजिटल माध्यमामुळे ही प्रक्रिया अधिक सोपी, जलद व पारदर्शक होणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी वेळेत स्व-गणना करून प्रशासनास सहकार्य करावे, असेही मान्यवरांनी नमूद केले.

# पालकांनो, गाफील राहू नका! : मीरा कडबे

## परतवाड्यात विशाल हिंदू जनसभा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१परतवाडा -** आपल्या सोबत अप्रीय घटना होऊ नये यासाठी आपली रक्षा आपल्यालाच करावी लागेल. प्रत्येकाने समाजहिताला प्राधान्य दिले पाहिजे. लव जिहादच्या आड मोठे षडयंत्र रचले जात आहे. आता गाफील राहू नका, असे आवाहन परतवाडा येथील विराट हिंदू जनसभेच्या प्रखर हिंदुत्वादी प्रमुख वक्त्या मीरा कडबे यांनी केले.

परतवाडा येथे विशाल हिंदू जनसभेचे आयोजन बुधवारी सायंकाळी सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. सर्व प्रथम त्यांच्या हस्ते नऊ कन्यांचे पूजन करण्यात आले. पुढे त्या म्हणाल्या, मुलींना शिकण्याकरता बाहेरगावी पाठवताना त्यांचा धर्म पक्का ठेवा. धर्म पक्का असेल तर त्यांना कोणी जाळ्यात अटकवणार नाही. मी कोण ? हे त्यांना माहीत असणे गरजेचे आहे. मातृशक्तीने मुलीकडे विशेष लक्ष देऊन संस्काराचे धडे देत समृद्ध व सक्षम बनवण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रमुख वक्ते अटल पांडे यांचे ही प्रेरणादायी भाषण झाले. पोलिस व प्रशासन त्यांचे काम करेल. परंतु, अल्पसंख्यांक समाज यांच्यामुळे जागेवर येणार नाही. त्याकरीता हिंदुंनाच सक्षम व्हावे लागेल. लव जिहाद सारख्या घटना परत घडू नये त्यासाठी सर्व हिंदुंनी भाईचारा सोडावा व जशास तसे उत्तर द्यावे, असा सल्ला त्यांनी दिला.यावेळी अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांचेही भाषण झाले. नगराध्यक्ष रूपाली माथने, अॅड. प्रमोदसिंह गड्रेल यांच्यासह अन्य मान्यवर आणि विविध पदाधिकारी व शेकडोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. पोलिसांचा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त जुळया शहरात ठेवण्यात आला होता.

# ‘हे सुरांनो चंद्र व्हा ...’, कार्यक्रमास अमरावतीकर रसिकांचा भरभरुन प्रतिसाद




आझाद हिंद मंडळ, बुधवारा, आम्ही सारे फाऊंडेशन तसेच सोमेश्वर पुसतकर मित्र परिवाराच्या वतीने 'सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सव २०२६'चे उत्साहात आयोजन करण्यात आले. या महोत्सवानिमित्त गुरुवारी सायंकाळी येथील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे 'हे सुरांनो चंद्र का...' या मराठी व हिंदी गीतांच्या बहारदार सादरीकरणाचा देखणा संगीत कार्यक्रम रंगला. या कार्यक्रमात गायक अनिरुद्ध जोशी, मधुरा कुंभार, मंगेश बोरगावकर आणि राधिका भिडे यांनी आपल्या सुरेल आवाजाने आणि उत्तम सादरीकरणाने अमरावती रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# अमरावतीच्या ‘लाईफलाईन’ उड्डाणपुलाचे काम अर्धवट

## नव्या पुलासाठी नागरिकांची प्रतीक्षा वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** : शहराची ‘लाईफलाईन’ समजला जाणारा राजकमल चौक ते रेल्वे स्थानकदरम्यानचा रेल्वे उड्डाणपूल पाडण्याचे काम अजूनही अर्धवटच असून नागरिकांच्या प्रतीक्षेला अधिक काळ लागणार आहे. २४ ऑगस्ट २०२५ रोजी हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. मात्र आठ महिने उलटूनही काम केवळ सुमारे ५० टक्केच पूर्ण झाले आहे.उड्डाणपुल तोडण्याच्या प्रत्यक्ष कामाला मार्च २०२६ मध्ये सुरुवात झाली. सुरुवातीला आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करण्यात वेळ गेला. त्यानंतर संबंधित यंत्रणेकडून दोन महिन्यांची डेडलाईन देण्यात आली होती. मे अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे संकेत देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात अजूनही मोठा भाग बाकी आहे.सध्या पुलावरील बहुतांश सिमेंटचा डेक स्लॅब कापून हटविण्यात आला आहे. क्रेनच्या सहाय्याने टप्प्याटप्प्याने हे काम करण्यात आले. आता केवळ लोखंडी ढाचा शिल्लक असून तो खाली उतरविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम मुंबईस्थित ‘मते अँड असोसिएट्स’ या कंपनीकडे सोपविण्यात आले आहे.



कंत्राटदारांच्या म्हणण्यानुसार, मे महिन्याच्या अखेरपर्यंत संपूर्ण पाडकाम पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.दरम्यान, उड्डाणपुल पाडण्याचे काम पूर्ण झाले नसल्याने नवीन पुलाच्या बांधकामाबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वाहतुकीची मोठी कोंडी होत असून पर्यायी मार्गांवर ताण वाढला आहे. नागरिकांना दररोज अडचणींचा सामना करावा लागत आहे.या उड्डाणपुलाच्या पाडकामासाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तर नवीन पुलाच्या बांधकामासाठी आमदार सुलभा संजय खोडके यांनी सुमारे १२५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. नवीन पूल उभारणीसाठी किमान दोन वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.एकूणच, शहराच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा उड्डाणपूल लवकरात लवकर पूर्ण व्हावा, अशी अपेक्षा अमरावतीकर व्यक्त करीत आहेत. नवीन पूल उभारल्यानंतरच वाहतुकीत खऱ्या अर्थाने दिलासा मिळणार आहे.

# उद्याला दुपारी १ वाजता निकाल

## बारावीची ई–मार्कशीट आणि सर्टिफिकेट असे करा डाउनलोड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच MSBSHSE २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करणार आहे. निकालासोबतच विद्यार्थ्यांना तात्पुरती गुणपत्रिका (Provisional Marksheet) तसेच ई-मार्कशीट (श–चरीज्ञीहशशीं) ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या त्यांच्या निकालाची आणि गुणपत्रिकेची प्रत सहज डाउनलोड करता येणार आहे.

बारावीची गुणपत्रिका ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे असून ती पुढील शिक्षण, प्रवेश प्रक्रिया आणि विविध स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असते. मात्र, ऑनलाइन उपलब्ध होणारी मार्कशीट ही तात्पुरती असते. विद्यार्थ्यांनी काही दिवसांनी त्यांच्या संबंधित महाविद्यालय




किंवा शाळेतून मूळ गुणपत्रिका घेणे आवश्यक आहे.

**ऑनलाइन बारावीची मार्कशीट कशी डाउनलोड कराल?**

विद्यार्थी त्यांचा निकाल आणि मार्कशीट mahresult.nic.in किंवा mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळांवरून पाहू शकतात. प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहे:

**सर्वप्रथम संबंधित वेबसाइट उघडा.**

"HSC Examination March 2026 Result' या लिंकवर क्लिक करा.

त्यानंतर तुमचा रोल नंबर आणि आईचे पहिले नाव प्रविष्ट करा.

"View Result' किंवा ‘निकाल पहा’ या बटणावर क्लिक करा.

स्क्रीनवर तुमची ऑनलाइन गुणपत्रिका दिसेल.


ती डाउनलोड करून प्रिंटआउट घ्या.

याच पोर्टलवरून विद्यार्थी बारावीचे उत्तीर्ण प्रमाणपत्र (Passing Certificate) देखील डाउनलोड करू शकतात. त्यासाठी वरीलप्रमाणेच प्रक्रिया पूर्ण करून "Get Certificate PDF' या पर्यायावर क्लिक करावे लागते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची डिजिटल प्रत सुरक्षित ठेवता येते.

# मुस्लीम मुलाच्या लग्नपत्रिकेत छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांचा उल्लेख

## समाज माध्यमांवर ही लग्नपत्रिका प्रसारित;चर्चा हि रंगल्यात

**दि.१अमरावती:**
‘आमच्या येथे येथे ईश्वर कृपेने व हजरत मकतुल्ला शाह बाबा यांच्या आशीर्वादाने मंगल कार्य करण्याचे योजिले आहे’, हा मजकूर आहे विवाहपत्रिकेतील आणि तो ही मुस्लीम मुलाच्या पत्रिकेत. हा विवाह सोहळा नुकताच पार पडला. विशेष म्हणजे, या विवाह पत्रिकेत छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांनी अनुक्रमे मुस्लीम आणि हिंदू धार्मिक स्थळांबद्दल दाखविलेल्या उदारतेविषयी माहिती नमूद आहे. समाज माध्यमांवर ही लग्नपत्रिका प्रसारित झाली आहे. त्याची चांगलीच चर्चा रंगली आहे.



### लग्नपत्रिकेत नेमका काय उल्लेख?

टिपू सुलतान यांचे गुरू पुरनैय्या पंडित होते. टिपू सुलतान यांनी १५६ मंदिरांना जमीन दान दिली, तर काशीच्या मंदिरात १० हजार सोन्याचे शिक्के दान दिले होते. त्याचप्रमाणे गुरू याकूब शाह यांच्या दर्ग्यासाठी शिवाजी महाराजांनी १०० एकर जमीन दान दिली होती. तसेच रायगडावर जगदीश्वराच्या मंदिरासोबतच मशीदही बांधली असल्याचे लग्न पत्रिकेत नमूद केले आहे. या विवाहाच्या निमित्ताने दोन्ही शूरवीर राजांच्या धार्मिक दृष्टिकोनाबाबतची माहिती समाजबांधवांना कळावी, या अनुषंगाने ही पत्रिका तयार करण्यात आली.

**विवाह समारंभाच्या पत्रिकेतील भाष्य**

वलगाव येथील ‘हिंदू मुस्लीम कौमी एकता मंच’ चे कार्यकर्ते शेख मजीद उर्फ मज्जूभाई यांचा मुलगा शोहेब अहमदचे लग्न अचलपूर तालुक्यातील पथ्रोट येथील मुस्लीम कुटुंबातील मुलीशी पार पडले. गेल्या २९ एप्रिल रोजी वलगाव येथे स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. या विवाहाच्या निमित्ताने छापलेल्या लग्नपत्रिकेत आमचे प्रेरणास्थान म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांचा आदरपूर्वक उल्लेख आहे.

**यापुर्वीही अशाच स्वरूपाची पत्रिका**

यापुर्वी वलगाव येथील ‘हिंदू मुस्लीम कौमी एकता मंच’ चे कार्यकर्ते अनिसभाई अहेमद मिर्झा यांच्या दोन मुलींच्या विवाहाच्या निमित्ताने छापलेल्या पत्रिकेत देखील छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्या कार्याविषयी माहिती प्रसिद्ध करण्यात आली होती. ३० ऑक्टोबर २०२२ रोजी वलगाव येथील सिकची मंगलम येथे हा विवाह सोहळा पार पडला होता. आमचे प्रेरणास्थान असा छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांचा उल्लेख होता. त्यावेळी या लग्नपत्रिकेची चांगलीच चर्चा झाली होती. सध्याच्या काळात धार्मिक तेढ वाढवण्यासाठी समाजातील काही प्रवृत्ती डोके वर काढत असताना सामाजिक, धार्मिक सलोखा कायम ठेवण्यासाठी मुस्लीम समुदायातील काही लोकांनी घेतलेला पुढाकार हा चर्चेचा विषय बनला आहे.

# अमरावती जिल्हा वकील संघ निवडणूक

## मतमोजणीला सुरुवात; अध्यक्षपदासाठी तिहेरी लढत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**–अमरावती जिल्हा वकील संघाच्या वार्षिक सर्वसाधारण निवडणुकीनंतर आज मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून आतापर्यंत १३ पैकी ७ सदस्यांचे निकाल जाहीर झाले आहेत. काल पार पडलेल्या मतदानाला वकिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.मतमोजणी सुरू होताच जिल्हा सत्र न्यायालयाच्या परिसरात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. काही उमेदवारांचे निकाल हाती येताच त्यांच्या समर्थकांनी न्यायालयाच्या आवाराबाहेर गुलाल उधळत जल्लोष साजरा केला. या वेळी पोलिस बंदोबस्तात मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडत आहे.यंदाच्या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी तिहेरी लढत रंगली असून ॲड. प्रशांत देशमुख, ॲड. धनराज साधवाणी आणि ॲड. अनिल विश्वकर्मा यांच्यात चुरशीची स्पर्धा पाहायला मिळत आहे. त्यामुळे अंतिम निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडत असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. मतमोजणी अजून सुरू असून उर्वरित सदस्यांचे तसेच अध्यक्षपदाचा निकाल रात्री उशिरा, सुमारे १० वाजल्यानंतर जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.एकूणच, वकील संघाच्या या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून अंतिम निकालानंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

# शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा अनादर की चूक?

## शिवरायांचा फोटो उलटा ठेवला; धीरेंद्र कृष्ण शास्त्री पुन्हा वादात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ भंडारा :**
बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे मागील काही दिवसांपासून वादग्रस्त विधानांमुळे सतत चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी त्यांच्या वक्तव्याचा निषेध करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर भंडारा येथे घडलेल्या नव्या घटनेमुळे पुन्हा एकदा वादाला तोंड फुटले आहे.

प्राप्त माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी नागपूर येथे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ते भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे स्नेह भेटीसाठी आले. परवा मध्यरात्रीच्या सुमारास ते भंडारा शहरातील शास्त्री चौकात पोहोचले. त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच मोठ्या संख्येने भक्तांनी गर्दी केली.

# मेळघाटमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई कशी दूर करणार ?

## प्रतिदिवशी टँकर पाठवण्याबाबतही उच्च न्यायालयाची विचारणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

सध्या विदर्भात उष्णतेची लाट आहे. त्याचवेळी मेळघाटसह आसपासच्या गावांना पिण्याच्या पाण्याचा प्रचंड तुटवडा जाणवतो आहे, गावांना प्रतिगाव एक मोठ्या आकारातील पिण्याच्या पाण्याच्या टँकरची तातडीने सोय करणार का ? अशी विचारणा उच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारकडे केली. तसेच त्यासंदर्भात पुढील सुनावणीला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

तापमानवाढीचा सर्वाधिक त्रास विदर्भातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे. तेथील तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होऊन तेथील उन्हाळा आणखी तीव्र होणार आहे. अशावेळी मेळघाट आणि आसपासच्या गावांकडे पिण्याच्या पाण्याचा साठा नाही.या परिसरात आतापासूनच मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई आहे. त्यामुळे या समस्येवर त्वरीत हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. अन्यथा तेथील नागरिकांचे जगणे कठीण होईल, अशा शब्दांत न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने चिंता व्यक्त केली. तसेच, मेळघाटातील पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जाणाऱ्या गावांची नावे सरकारी वकीलांकडे सादर करण्याचे आदेश न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना दिले.त्याचवेळी या गावांना दररोज एक मोठ्या



आकाराचा टँकर भरून पिण्याचे पाणी पुरवण्याबाबत माहिती घेऊन ती पुढील सुनावणीला सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. हा पुरवठा एकापेक्षा अधिक टँकरद्वारेही असू शकतो. पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत, अशा प्रकारचा पाणीपुरवठा अविरत सुरू राहिला पाहिजे, त्यासंदर्भात कृती आराखडा तयार करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

### तर प्रधान सचिव पाण्याविना राहू शकतील का ?

संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना सकाळी न्यायालयात येण्यास सांगावे. त्यानंतर त्यांनी सायंकाळी सहापर्यंत वातानुकूलित न्यायदालनात बसून राहावे. या काळात त्यांना पिण्यासाठी पाणी मिळाले नाही, तर चालेल का ? पाण्याशिवाय बसणे त्यांना जमेल का ? अशी विचारणा न्यायालयाने अतिरिक्त सरकारी वकील भूपेश सामंत यांना केली. सर्वसामान्य आदिवासी ४५ ते ४८ अंश सेल्सियसमध्ये पाण्याविना कसे राहत असतील ? पाण्यासाठी त्यांना किती पायपीट करावी लागत असेल ? याचा विचार करा, असे न्यायालयाने सुनावले. तसेच, तापमानवाढीमुळे विदर्भातील पाण्याची समस्या आणखी तीव्र होणार असल्याचे आम्ही मागील सुनावणीच्या वेली म्हटले होते याचीही न्यायालयाने आठवण करून दिली.

### मेळघाटमधील अनेक गावात पाणीटंचाई

मेळघाट, चिखलदरा, धारणी आणि चुरणीसह अन्य गावांना उष्णतेचा फटका बसत असून अनेक गावात पाणीबाणीची परिस्थिती आहे. चिखलदरात एका ठिकाणी ८३ लाख रुपये खर्च करून पाण्याची टाकी बांधण्यात आली. परंतु. पिण्याच्या पाण्याची समस्या तशीच असल्याचा दावा याचिकाकर्त्यांच्यावतीने वकील जुगलकिशोर गिल्डा यांनी केला.